# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 31.07.2021** **वारः शनिवार**

---

**आधी एक विनंती....**
**महाराष्ट्रात 18 वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू झाली आहे. सर्वांनी लसीकरण करून घ्या. पण नंतरही काळजी घ्या. मुखपट्टी वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करू नका. कोविड-19 बद्दल काही प्रश्न असतील तर 011-23 978 046 आणि 1075 या राष्ट्रीय; तसंच 020-26 127 394 या महाराष्ट्रासाठीच्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधा.**

---

1. पूरपरिस्थितीला कारणीभूत ठरणारं नदी, नाले, ओढ्यांवरील अतिक्रमण काढण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश, आणखी कठोर निर्णयाचे संकेत
2. सी बी एस ई चा इयत्ता बारावीचा निकाल 99 पूर्णांक 37 शतांश टक्के
3. यंदाचा टिळक पुरस्कार 'सायरस पूनावाला' यांना जाहीर
4. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख, यांचं निधन आणि
5. टोकियो ऑलिंपिक्समध्ये अनेक भारतीय खेळाडू पदक निश्चितीच्या समीप

---

**<u>मुख्यमंत्री कोल्हापूर दौरा</u>**

वारंवार पुराचा धोका असणाऱ्या गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावू असं आश्वासन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. कोल्हापूरसह शिरोळ तालुक्यातील पूरग्रस्त भागाचा पाहणी दौरा काल मुख्यमंत्र्यांनी केला. यावेळी पूरग्रस्त स्थानिक रहिवाश्यांबरोबर त्यांनी संवादही साधला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. पूरबाधित क्षेत्रातील गावं तसंच दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या वस्त्यांचं चांगल्या पद्धतीनं पुनर्वसन करण्यावर राज्य शासनाचा भर राहील, असं सांगून भविष्यात पूरपरिस्थितीत नागरिकांचं नुकसान होऊ नये, यासाठी आता काही कठोर निर्णय घ्यावे लागतील, असा इशारा ठाकरे यांनी यावेळी दिला.

राज्यात कोल्हापूर, सांगलीसह अन्य काही जिल्ह्यांवर अतिवृष्टीमुळं पुराचं संकट ओढवलं आहे. नदी, नाले, ओढ्यांवर नागरिकांनी अतिक्रमण केल्यामुळं आणि रेड-ब्ल्यू लाईनमध्ये झालेल्या बांधकामांमुळे ही स्थिती निर्माण झाल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. भविष्यात अशा बांधकामांना परवानगी देऊ नये, या भागात झालेली अतिक्रमणं काढावीत, अशा सक्त सूचना ठाकरे यांनी यावेळी दिल्या.

पूर-परिस्थितीत झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्यांचा आढावा घेऊन राज्य शासन पूरग्रस्तांना भरीव मदत करेल, यासाठी केंद्राकडेही, आर्थिक मदत मागितली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केलं......

**त्यांचंसुद्धा, त्या गावाचसुद्धा पुनर्वसन करणं हासुद्धा एक मोठा आराखडा आहे. तर असं फार मोठं काम येत्या काही वर्षात आपल्याला सगळ्यांना मिळून करावं लागेल, आणि म्हणून मी इथल्या नागरिकांनासुद्धा हेच**

**सांगतो आहे, की अशा वेळेला काही ठिकाणी आपल्याला थोडेसे कठोर निर्णय घ्यावे लागतील. ह्याच्यापुढे अशा बांधकामांना आता परवानगी देता येणार नाही. जिथे आपण ब्लू लाईन, रेड लाईन जीकाय तुमची लाईण आहे, नाहीतर मग या लाईनी मारू नका, म्हणजे जे काय होईल ते होऊ द्यात, असं नाही चालणार. कारण शेवटी हे कोणाच्यातरी जीवावर बेतत असतं, असे जीव नाहक आपल्याला गमवता येणार नाहीत. तात्काळ यातनं बाहेर पडणं हा एक महत्वाचा मुद्दा आहे. आणि कायमस्वरूपी त्याला ईलाज करणं हा त्याहून आणखी महत्वाचा भाग आहे.**

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही काल कोल्हापूर इथं पूरग्रस्त भागाची पाहणी करत पत्रकार परिषद घेतली. पूरग्रस्तांना तातडीनं मदत न मिळाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**राज्यातल्या सगळ्या बँका एसएलबीसीच्या अंतर्गत येतात, आणि अशा प्रकारच्या डिझास्टरमध्ये या एसएलबीसीला निर्णय घेण्याचे अधिकार असतात. त्यामुळं मागच्या काळात आम्ही देखिल जेव्हा कोल्हापूर आणि सांगलीचा पूर झाला तेच्हा एसएलबीसीच्या चेअरमनला बोलावलं आणि त्याठिकाणी त्यातले काही निर्णय आम्ही केले होते. तर केंद्र तर मदत करेलच, पण मला असं वाटत, की माननिय मुख्यमंत्र्यांनी तात्काळ जर एसएलबीसीची बैठक जर बोलावली तर त्या बैठकीतनं जसं मागच्यावेळेस आम्ही कर्ज माफी काही केली, काही कर्ज स्थगित केली, काही व्याज सवलती दिल्या, त्या सगळं एसएलबीसीतून निर्णय होतो. तर अशाप्रकारची एसएलबीसीची बैठक बोलावली, तर बँकांना निश्चितपणे त्याठिकाणी त्यांना निर्देश देता येतील, हे निर्देश देण्याचे सगळे अधिकार हे माननिय मुख्यमंत्र्यांना आहेत.**

**रस्त्यांचे नुकसान**

राज्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळं 1800 कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज सार्वजनिक बांधकाम विभागानं वर्तवला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

चव्हाण म्हणाले की, राज्याच्या सर्वच विभागांमध्ये अतिवृष्टी, पूर आणि भुस्खलनामुळं रस्ते आणि पूलांचं प्रचंड नुकसान झालं असून सर्वाधिक सुमारे सातशे कोटी रुपयांचं नुकसान एकट्या कोकण विभागात झालं आहे. त्याखालोखाल पुणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर आणि नाशिक विभागात नुकसान झालं आहे.

**संसद स्थगित**

पेगॅसस हेरगिरी प्रकरण, शेतकरी आंदोलन आणि इतर मुद्द्यांवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कालही, संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ केला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज अनेकदा स्थगित केल्यानंतर, ते दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

या गदारोळातच लोकसभेत विमा व्यवहार राष्ट्रीयकरण दुरुस्ती विधेयक, तसंच राष्ट्रीय राजधानी आणि संलग्न क्षेत्रासाठीच्या हवेची गुणवत्ता व्यवस्थापन विधेयक सादर करण्यात आलं. राज्यसभेतही गदारोळातच नारळ विकास मंडळ विधेयकाला मंजुरी देण्यात आली. हे विधेयक शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल असं कृषी मंत्री नरेंद्र सिंह तोमर यांनी अल्प चर्चे दरम्यान सांगितलं.

**सीबीएसई निकाल**

केंद्रीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या अर्थात सीबीएसईतर्फे यावर्षी घेण्यात आलेल्या 12 वीच्या परीक्षांचे निकाल काल जाहीर झाले. यामध्ये देशात उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे.

उत्तीर्ण विध्यार्थ्यांमध्ये मुलींचं प्रमाण 99 पूर्णांक 67 शतांश टक्के तर मुलांचं प्रमाण 99 पूर्णांक 13 शतांश टक्के आहे. देशात या परीक्षेला बसलेल्या एकंदर 13 लाख विद्यार्थ्यांपैकी 12 लाख 96 हजार 318 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे प्रमाण 99 पूर्णांक 37 शतांश टक्के आहे. कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर यावर्षी 12 वी ची प्रत्यक्ष परीक्षा रद्द करण्यात आली होती आणि अंतर्गत मूल्यमापन पद्धतीवर निकाल जाहीर करण्यात आले.

**पुणे मेट्रो चाचणी**

पुणे मेट्रोच्या वनाज ते रामवाडी या मार्गावरील वनाज ते आयडियल कॉलनी, या मार्गिकेवर काल मेट्रोची चाचणी घेण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मेट्रोला हिरवा झेंडा दाखविला. यावेळी पुणे मेट्रोसाठी तयार होणाऱ्या डब्यांच्या प्रतीकृतीचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाला महापौर मुरलीधर मोहोळ, विधानसभेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, महा मेट्रोचे संचालक ब्रिजेश दीक्षित उपस्थित होते.

'पुणे हे देशातलं सर्वात चांगलं, सुरक्षित आणि सर्व सोयींनी युक्त असं शहर बनवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे; मेट्रो हा त्याचाच एक भाग असून, पुण्याच्या आधुनिक इतिहासात मेट्रोची नोंद होईल,' असा विश्वास संपर्कमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केला. 'पुणे मेट्रोच्या कामासाठी निधी अजिबात कमी पडू देणार नाही,' अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. ऑक्टोबर ते नोव्हेंबरपर्यंत वनाज ते गरवारे कॉलेज दरम्यानच्या पाच किलोमीटर मार्गावर मेट्रो सेवा सुरू होईल, असा विश्वास महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रीजेश दीक्षित यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रीय फिल्म संग्रहाल**

पुण्यातल्या राष्ट्रीय फिल्म संग्रहालयाच्या खजिन्यात नुकतीच एक मोलाची भर पडली आहे. भारतीय चित्रपट सृष्टीच्या प्रारंभीच्या काळाची साक्ष देण्याऱ्या काचेच्या 450हून अधिक चित्रफिती एनएफएआयला मिळाल्या आहेत. ऐकूया त्याबद्दलचा अधिक वृत्तांत...

**राष्ट्रीय फिल्म संग्रहालयाला, 30 ते 50 च्या दशकातील तेलगू चित्रपटांच्या काचेच्या 450 हून अधिक चित्रफिती मिळाल्या आहेत. दोन पातळ काचांच्या मध्ये चित्रफीत पॉझिटिव्ह दाबून या काचा तयार केल्या जात असत. एखादा नवा सिनेमा येणार असेल, तर त्याची घोषणा करण्यासाठी, जाहिरात करण्यासाठी या स्लाइड्सचा वापर होत असे. सिनेमाच्या मध्यंतरात किंवा चित्रपट सुरु होण्यापूर्वी थिएटर मध्ये या स्लाइड्स दाखवल्या जात असत. चित्रपट क्षेत्रात संशोधन करणाऱ्यांसाठी हा एक महत्वाचा संदर्भ ठरेल असं एनएफएआय चे संचालक प्रकाश मगदूम यांनी सांगितलं. सध्या एनएफएआय च्या संग्रहालयात, हिंदी, गुजराती आणि तेलगू भाषेतील 2000 पेक्षा अधिक काचेच्या स्लाइड्स आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी लौकिका रास्ते पुणे.**

**पूनावाला यांना टिळक पुरस्कार**

सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष, डॉक्टर सायरस पूनावाला यांना लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीनं दिला जाणारा यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली.

सीरम इन्स्टिट्यूटनं संशोधित केलेल्या कोविशील्ड लसीनं भारतासह जगभरातील कोट्यवधी नागरिकांना कोरोनापासून सुरक्षित ठेवलं. लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीच्या तत्त्वासाठी डॉक्टर पूनावाला यांच्या नेतृत्वाखाली पूनावाला समूहाच्या कंपनीनं मोठी झेप घेतली असून ते अधोरेखित करण्यासाठी डॉक्टर सायरस पूनावाला यांची यंदाच्या पुरस्कारासाठी एकमतानं निवड केल्याचं टिळक यांनी सांगितलं.

येत्या 13 ऑगस्ट रोजी टिळक  महाराष्ट्र विद्यापीठात हा पुरस्कार वितरण समारंभ होणार असून, यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**चितमपल्ली जीवनगौरव**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा, प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ वन अभ्यासक आणि लेखक मारुती चितमपल्ली यांना जाहीर झाला आहे. 51 हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर मृणालिनी फडणवीस यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. डॉक्टर चितमपल्ली यांनी निसर्ग, पक्षी, वन आणि साहित्य क्षेत्रात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल या पुरस्कारानं त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

**सामंजस्य करार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांच्या दरम्यान काल एक सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी, पीएमपीएमएल चे अध्यक्ष लक्ष्मीनारायण मिश्रा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. 'ट्रान्सपोर्ट फॉर ऑल' या संकल्पनेतून हा प्रकल्प हाती घेतला आहे. पुणे विद्यापीठाकडून होणाऱ्या अभ्यासातून आम्हाला नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यातल्या अडचणी सोडवणं शक्य होईल. असं मिश्रा यावेळी म्हणाले.

**शेकाप नेते भाई देशमुख निधन-सोलापुर**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि सांगोल्याचे माजी आमदार, भाई गणपतराव देशमुख यांचं काल रात्री सोलापुरातील एका खासगी रूग्णालयात निधन झालं. ते 94 वर्षाचे होते. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघातून 11 वेळा ते विधानसभेवर निवडून आले होते. 2009 च्या निवडणुकीत विजय मिळवून, करुणानिधी यांच्या पाठोपाठ दहाव्यांदा आमदारकीची निवडणूक जिंकणारे, देशमुख हे देशातले दुसरे आमदार ठरले होते. अत्यंत साधी राहणी असलेल्या गणपतरावांनी 54 वर्षं सांगोल्याचं प्रतिनिधित्व केलं होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज सांगोला इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

आदर्श लोकप्रतिनिधी असलेल्या देशमुख यांनी शेतकरी, कष्टकरी आणि जन-सामान्यांप्रती आपली बांधिलकी शेवटपर्यंत जपली अशा शब्दांत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गणपतराव देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

राजकारण आणि समाजकारणातील एक साधं, सात्विक व्यक्तिमत्व हरपलं अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तर गणपतराव देशमुख यांनी अर्ध्या शतकाहून अधिकच्या प्रदीर्घ संसदीय कारकिर्दीत ध्येयनिष्ठा, पक्षनिष्ठा कायम जपली. राजकीय, सामाजिक चळवळीला सुसंस्कृत चेहरा दिला; राजकारणाला नैतिक अधिष्ठान दिलं; अशा शब्दांत उप-मुख्यमंत्री अजित पवार यांनी गणपतराव देशमुख यांना  श्रद्धांजली वाहिली आहे.

**सुषमा अभ्यंक निधन-नाशिक**

नाशिकच्या बालनाट्य चळवळीची मुहूर्तमेढ उभी करणाऱ्या लेखिका आणि मराठी भाषेच्या शिक्षिका सुषमा अभ्यंकर यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 95 वर्षांच्या होत्या. काल सकाळी नाशिक इथं त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. लोकहितवादी मंडळाच्याअनेक नाटकांमधून त्यांनी कामं केली. या निमित्तानं त्यांना बालगंधर्वांचा सहवास लाभला. राजदत्त यांनी दिग्दर्शित केलेली विनायक दामोदर सावरकर ही मालिका तसंच 'कथास्तु' मालिकेत त्यांनी अभिनय केला होता. सदाफुली या बालनाट्य संस्थेची स्थापना करून अनेक बालनाट्य त्यांनी

रंगभूमीवर आणली. त्यांनी लिहिलेल्या बालनाट्य संहितांना राज्य शासनाचे उत्कृष्ट वाड्मय निर्मिती पुरस्कारही मिळाले होते.

**नक्षल्यांचे आत्मसमर्पण- गडचिरोली**

गडचिरोली इथं काल दोन जहाल नक्षलवादी, पोलिसांना शरण आले. पोलिस अधीक्षक अंकित गोयल यांच्यासमोर त्यांनी शस्त्रं खाली ठेवली. विनोद उर्फ मनिराम नरसू बोगा आणि कविता उर्फ सत्तो हरिसिंग कोवाची अशी त्यांची नावं आहेत. या नक्षल्यांवर 8 लाखांचं बक्षीस जाहीर झालं होतं. विनोद, हा 'कोरची दलम'चा सदस्य होता तर कविता 'टिपागड दलम'ची सदस्य होती. 28 जुलैपासून नक्षल्यांचा शहीद सप्ताह सुरु झाला आहे. या पार्श्वभूमीवर दोन नक्षली शरण येणं ही घटना महत्वाची असल्याचं गोयल म्हणाले.

**ऑलिम्पिक्स**

टोकियो ऑलिम्पिक्समध्ये आज अनेक भारतीय खेळाडू पदक निश्चितीच्या फेरीपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळं आज होणाऱ्या स्पर्धांच्या निकालाकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

या स्पर्धांमध्ये कालचा दिवस भारतीय क्रीडा रसिकांसाठी उत्साहवर्धक ठरला. भारताची मुष्टीयोद्धा लवलीना बोरगोहेन हिनं चीनी तैपेईच्या, चेन नियान चीन, हिचा 4-1 असा पराभव केला आणि भारतासाठी आणखी एक पदक निश्चित केलं. बॅडमिंदनमध्ये भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू हिनं उपांत्य फेरीत प्रवेश केला. काल झालेल्या रोमहर्षक लढतीत सिंधूनं जपानच्या 'अकाने यामागुची' हिचा 21-13; 22-20 असा पराभव केला.

भारताच्या महिला हॉकी संघानं 'अ' गटाच्या सामन्यात आयर्लंड संघाचा पराभव करत स्पर्धेतलं आपलं आव्हान टिकवून ठेवलं. त्याचवेळी, भारतीय पुरुष हॉकी संघानं जपानला शेवटच्या गट सामन्यात, 5-3 अशा गोल्सनं पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

भारताची आघाडीची महिला तिरंदाज दीपिका कुमारीचा ऑलिम्पिकमधला प्रवास मात्र संपुष्टात आला आहे. उपांत्यपूर्व फेरीत दीपिकाला दक्षिण कोरियाच्या 'अन सान' हिनं अवघ्या सहा मिनिटात 6-0 असं पराभूत केलं.

---

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.